# वसई-विरार शहर महानगरपालिका
## अनधिकृत बांधकाम विभाग

दि.१९/१०/२०२२

## <u>प्रेसनोट</u>

दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार व अति.आयुक्त श्री.आशिष पाटील यांचे निर्देशानुसार व उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांचे मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती ‘सी’ चंदनसार व प्रभाग समिती ‘जी’ अंतर्गत अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

प्रभाग समिती ‘**सी**’ मधील सहकार नगर, रिक्षा स्टॅण्ड जवळ, विरार पूर्व परिसरातील ४००० चौ.फुट क्षेत्रफळ आर.सी.सी.बांधकाम केलेल्या व १८ सदनिका व ७ दुकाने असलेल्या G + ३ मजली अनधिकृत इमारतीवर प्रभाग समिती ‘सी’ चंदनसार चे प्र.सहा.आयुक्त श्री. गणेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली निष्कासनाची कारवाई करून सदर इमारत भुईसपाट करण्यात आली. यावेळी श्री.अजित मुठे, उप-आयुक्त अतिक्रमण विभाग, प्र.सहा.आयुक्त श्री. गणेश पाटील, अतिक्रमण विभाग प्रमुख विजय गोतमारे, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान व अतिक्रमण विभागाचा कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

तसेच प्रभाग समिती ‘**जी**’ वालीव अंतर्गत अमन इंडस्ट्रीज, सातीवली गावदेवी मंदिरासमोर, वसई पूर्व या ठिकाणी ३२०० चौ.फुट क्षेत्रफळ आर.सी.सी.बांधकाम केलेल्या अनधिकृत गाळ्यावर प्रभाग समिती ‘जी’ वालीव चे सहा.आयुक्त श्रीम.धनश्री शिंदे यांच्या नेतृत्वाखाली निष्कासनाची कारवाई करण्यात आली. यावेळी श्री.अजित मुठे, उप-आयुक्त अतिक्रमण विभाग, सहा.आयुक्त श्रीम.धनश्री शिंदे, कनिष्ठ अभियंता श्री.कल्पेश कडव, लिपिक श्री.विजय नडगे, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान व अतिक्रमण विभागाचा कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.आयुक्त महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात होत असलेल्या अतिक्रमण, अनधिकृत बांधकामांवर नियमित कारवाई सुरु करण्यात आली आहे.

**अनधिकृत बांधकाम विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**